


# विशेष पोलीस महानिरीक्षक
# अमरावती परिक्षेत्र,अमरावती.


## मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
## क्षेत्रीय कार्यालयासाठी 100 दिवसीय
## कृती आराखडा कार्यक्रम.

# 100 दिवस कृती आराखडा.

1. संकेतस्थळ.
2. सुकर जीवनमान.
3. स्वच्छता.
4. जनतेच्या तक्रारींचे निवारण.
5. कार्यालयीन सोयी व सुविधा.
6 .गुंतवणुकीस प्रोत्साहन.
7. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी.
8. ई-ऑफिस प्रणाली.
9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण,सेवा विषयक बाबी आणि कुत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI).
10.नाविन्यपूर्ण उपक्रम.

# 1. संकेतस्थळ

https://www.igpamravatirange.gov.in







विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयातील संकेतस्थळ जुने झाल्याने GRACE INFO SOFT PVT LTD यांचेकडून संकेतस्थळ दिनांक 01/01/2025 पर्यंत नव्याने अद्यावत करण्यात आले आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे ..

1. विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी/मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यासनाच्या माहितीसह तसेच परिक्षेत्रात कार्यरत संपूर्ण पोलीस अधिकारी यांची माहिती संपर्क क्रमांकासह अद्यावत करण्यात आली आहे.
2. संकेतस्थळ हे सर्व सामान्य नागरिकांना हाताळण्यास सोपे जाईल याप्रमाणे मराठी व इंग्रजीमध्ये बनविण्यात आलेले आहे.
3. माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार माहिती अद्यावत करण्यात आली आहे.
4. संकेतस्थळ हे GRACE INFO SOFT PVT LTD यांचेकडून NIC च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सुरक्षित करण्यात आले आहे .
5. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात आल्या आहे .

## 2. सुकर जीवनमान :-

(अ) विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती या कार्यालयामध्ये भेटीकरीता येणारे नागरिक यांचेकरीता स्वागत कक्ष तयार करण्यात आला आहे.



(ब) विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती या कार्यालयामध्ये भेटीकरीता येणारे नागरिक यांचेकरीता अभ्यागत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.



# अभ्यागत कक्ष

## Visitor Management System





# 3. स्वच्छता :-

## (अ) अभिलेख निंदनीकरण व वर्गीकरण :-

सन 2023 पर्यंत चे अ व ब अभिलेख निंदनीकरण डिसेंबर 2023 मध्ये करण्यात आले होते.सन 2024 चे अ व ब अभिलेख निंदकरणाचे काम 100% पूर्ण झाले आहे.

## (आ) मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे :-

सन 2023 पर्यंतचे नाश करण्यालायक मुदतबाह्य अभिलेख डिसेंबर 2023 मध्ये नष्ट करण्यात आले असून तदनंतरचे सन 2024 चे मुदतबाह्य अभिलेख निंदनीकरणाचे काम 100% पूर्ण झाले असून नष्ट करण्यात आले आहे .

## (इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अद्यावतीकरण :-

सन 1980 ते 1993 ,1994 ते 2014 ,2015 ते आजपावेतो अश्या तीन जड संग्रह नोंदवह्या अद्यावत नोंदीसह अभिलेखावर जतन करून सुस्थितीत ठेवण्यात आल्या आहेत.

## (ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट :-

सन 2023 पर्यंतच्या निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट डिसेंबर 2023 मध्ये लावण्यात आली असून तदनंतरचे सन 2024 च्या जडसंग्रहाच्या निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

## (उ) जुन्या वाहनाचे निर्लेखन :-

जुने निर्लेखित करावयाचे वाहने या कार्यालयाच्या अभिलेख वर उपलब्ध नाही .

## 4. जनतेच्या तक्रारींचे निवारण :-

**(अ) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे निराकरण (दि.1 जानेवारी 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) :-**

आपले सरकार पोर्टलवर सन 2024 मध्ये 308 तक्रार अर्ज प्राप्त असून सर्व निकाली काढण्यात आले आहे. दिनांक 1 जानेवारी 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक आहे.

**(आ) पी.जी.पोर्टल वरील तक्रारीचे निराकरण (दि.1 जानेवारी 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) :-**

पी.जी.पोर्टल वर सन 2024 मध्ये 15 तक्रार अर्ज प्राप्त झाले असून सर्व तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले आहे. दिनांक 1 जानेवारी 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक आहे.

**(इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळाबाबत प्रसिद्धी :-**

अभ्यागत भेटीची वेळ निश्चित करून तसा फलक दर्शनी भागात लावण्यात आला आहे.याशिवाय इतर वेळी कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांना सुद्धा तात्काळ भेट देऊन त्यांचे अडीअडचणी ऐकूण निराकरण करण्यात येते.

**(ई) लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारीचे निराकरण :-**

लोकशाही दिनाच्या संदर्भात प्राप्त सर्व तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून एकही तक्रार प्रलंबित नाही. लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथे हजर राहून पोलीस विभागाशी संबंधित तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.

# 5. कार्यालयातील सोयी व सुविधा :-

## (अ) कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था:-

कार्यालयामध्ये कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेकरीता नवीन वाटर फिल्टर तथा कुलर लावण्यात आले आहे.



# (आ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था :-

कार्यालयातील कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी असणाऱ्या प्रसाधन गृहाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. पुरुष व स्त्रियाकरीता वेगवेगळी प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.



# (इ) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय व्यवस्था :-

कार्यालय मध्ये येणाऱ्या अभ्यागतासाठी स्वागतकक्ष तयार करण्यात आले असून त्याठिकाणी सर्व वर्तमानपत्रे व इतर संदर्भासाठी कायद्याची पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात.






## (ई) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे :-

अभ्यागताकरिता कार्यालयामध्ये दर्शनीय भागात नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहे.


















## (उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरण :-

कार्यालयातील वातावरण प्रसन्न राहण्याकरीता कार्यालयाच्या आवारामध्ये फुले व फळ झाडांनी सुसज्ज बगीचा असून त्याची निगा व देखभाल करण्यात येते तसेच कार्यालयाची रंगरंगोटी करून सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. कार्यालयातील कर्मचारी व अभ्यागत यांना वाहने ठेवण्याकरीता वाहनतळ तयार करण्यात आले आहे.



# 6 .गुंतवणुकीस प्रोत्साहन :-

आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकी बाबत पोलीसांशी संबंधित तक्रारी आमचे परिक्षेत्रात प्राप्त नाहीत. भविष्यात नव्याने येणाऱ्या प्रकल्पाबाबत अशा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांना पूर्ण सहकार्य करून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यात येतील व आर्थिक आणि औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळणेसाठी प्रयत्न करण्यात येतील.



# 7. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी .

**(अ) आठवड्यातून किमान 2 दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे :-**

दरमहा परिक्षेत्रातील एका घटकाला आकस्मित भेट देऊन पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तसेच पोलीस स्टेशनला भेट देऊन गुन्ह्याचा व दैनंदिन कामकाजाचा तसेच उपलब्ध सुविधांचा आढावा घेण्यात येतो. महत्वाच्या व्यक्तींच्या भेटी व सण उत्सवादरम्यान घटकांना भेटी देऊन अधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येते व त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत तसेच आवश्यक  उपाययोजना बाबत मार्गदर्शन करण्यात येते.



## (ई) पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे अनुभव,अडचणी व सूचना यांवर त्वरित कार्यवाही करणे :-

पोलीस घटकाच्या भेटीवेळी दरबार घेऊन तसेच आज्ञांकित कक्षाची मागणी केल्यास तात्काळ वेळ देऊन अधिकारी व कर्मचारी यांच्या अडीअडचणी ऐकून त्या सोडविल्या जातात



# 8. ई - ऑफिस प्रणाली :-

**(अ) प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी 2025 पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे :-**

कार्यालयामध्ये दिनांक 18/08/2023 पासून ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर चालू आहे .

दि.17/04/2025 रोजीची स्थिती :-

| कार्यालयाचे नाव | प्राप्त | निर्गती | प्रलंबित |
|---|---|---|---|
| विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय अमरावती. | 8206 | 12643 | 05 |

**(आ) ई-ऑफिस प्रणालीत 4 किवां त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणाचा निपटारा करणे :-**

सदर विभागात 4 किवां त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणाचा निपटारा करण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

# 9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण,सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI):-

## (अ) नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे :-

नव्याने सेवेत प्रविष्ट प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी यांना कार्यालयात बोलावून तसेच घटकाचे भेटीदरम्यान मार्गदर्शन करण्यात येते.तसेच लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (कालबद्ध प्रशिक्षण) नियम- 2022 प्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख,विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधीनी अमरावती यांचे कडे परिक्षेत्रातील (302) लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या नावांची शिफारस दि.28/02/2025 रोजी करण्यात आली असून लवकरच प्रशिक्षण सत्र आयोजित होणार आहे ,परिक्षेत्रातील सर्व घटकांमध्ये नवीन कायदा जनजागृती संबंधाने ग्राम पंचायत व तालुका स्तरावर एकूण अपेक्षित 50 कार्यशाळा 100% पूर्ण घेण्यात आल्या आहेत. तसेच परिक्षेत्रातील हजर पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे नवीन कायदा प्रशिक्षण 100% पूर्ण झालेले आहे.

## (आ) पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणे :-

सन 2024 मध्ये 16 व 2025 मध्ये 01 कनिष्ठ श्रेणी लिपिक यांना वरिष्ठ श्रेणी लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे . पदोन्नत्या तसेच इतर तक्रारीबाबत अधिकारी/कर्मचारी यांना आज्ञांकित कक्षात तात्काळ बोलावून त्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येते तसेच परिक्षेत्रातील घटकांना दिलेल्या भेटीदरम्यान दर महिन्यास रिक्त होणारी पदे पदोन्नतीने भरण्याबाबत सर्व पोलीस अधीक्षक यांना आदेशित केलेले आहे त्या नुसार कार्यपूर्ती करण्यात येते.

## 10.नाविन्यपूर्ण उपक्रम :-

# कार्यालयामध्ये VISITOR MANAGEMENT SYSTEM सुरु करण्यात आली आहे.



मुख्य उदीष्ठ :-

- ✓ सदर यंत्रणा राबवितांना या कार्यालयामध्ये विविध कामांसाठी येणाऱ्या अभ्यांगतांची माहिती संगणकामध्ये संकलित करणे.
- ✓ कार्यालयात आलेल्या अभ्यांगताचे काम कमीत कमी वेळात विनाविलंब पुर्ण होवून त्यातून त्यांचे समाधान करणे.
- ✓ सामान्य नागरीकांच्या तक्रारींचे निराकरण पोलीस स्टेशन स्तरावर करण्यात येत आहे किंवा नाही याचेवर वरीष्ठ पातळीवरून लक्ष ठेवले जाते.
- ✓ अभ्यांगताला संपर्क करून योग्य मदत व कामाचे समाधान झाल्याची खात्री करणे .
- ✓ पोलीस  व जनता यांचेमधील संबध वृदिधगंत करणे .
- ✓ सर्व सामान्य जनतेने या सुविधांचा लाभ घ्यावा आणि सुरक्षित समाज निर्माण करावा हाच या योजनेचा हेतू आहे.

# Visitor management system

SIGN IN

Visitor Management System

**Spl. Inspector General of Police Amravati Range, Amravati**

Igpamravati

············

Remember Me

LOGIN

**Special Inspector General of Police Near Maltekdi, Camp Road, Amravati – 444602 (M.S.)**
**Tel. 0721 / 2663226**
**Control Room Tel:-0721/2663256**
**Control Room Fax :- 0721/2663256**
**ig.amravatirange@mahapolice.gov.in**

काही प्रॉब्लेम असल्यास **9767671084** वर संपर्क साधावा
धन्यवाद

**Spl. Inspector General of Police Amravati Range** Visitor Management System

Visitor Information | Search

Spl, IGP Amravati Range, Amravati | Logout

अभ्यागताचे नाव: Name

Email id: Name

मोबाईल क्रमांक: Mobile No

अभ्यागताचे छायाचित्र

Webcam could not be started. Did you give access to it?

Browse..

TAKE SNAPSHOTS

कामाचे स्वरूप / तक्रार: Please Select Visit Purpose

Browse..

अभ्यागताचे कामाचे स्वरूप थोडक्यात

अभ्यागताचा संपूर्ण पत्ता

Submit

From: To: SEARCH

Search

| S.No | अनुक्रमांक | अनु.क्र. | अभ्यागताचे छायाचित्र | अभ्यागताचे नाव | मोबाईल क्रमांक | कामाचे स्वरूप / तक्रार | अभ्यागताचे आगमन / निर्गमन वेळ | Status | Date | Police Station | Assigned to | शेरा | Action |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2025-03-18/Spl, IGP Amravati Range, Amravati/4 | 4 | | प्रतिभा गजभिये | 8275218836 | इतर कामे / | 07:58:42 / | Pending | 18-03-2025 | Spl, IGP Amravati Range, Amravati | | | |
| 2 | 2025-03-17/Spl, IGP Amravati Range, Amravati/3 | 3 | | डॉ.वसंतराव मारोतराव धाडवे | 7309567555 | वैयक्तिक काम / | 07:10:20 / | Pending | 17-03-2025 | Spl, IGP Amravati Range, Amravati | | | |
| 3 | 2025-03-13/Spl, IGP Amravati Range, Amravati/2 | 2 | | पो.नि.भूषण गावंडे | 9922880786 | वैयक्तिक काम / | 12:23:59 / | Pending | 13-03-2025 | Spl, IGP Amravati Range, Amravati | | | |
| 4 | 2025-03-10/Spl, IGP Amravati Range, Amravati/1 | 1 | | गोविंद वर्मा | 9970033355 | इतर कामे / | 11:49:27 / | Pending | 10-03-2025 | Spl, IGP Amravati Range, Amravati | | | |

Previous 1/1

# Thank You

